## निशाणी क्र.४४ वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ०६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथन असे आहे की, सदरचा दावा प्रतिवादींविरुद्ध दावा मिळकतींचे सरनिरस मानाने वाटप होऊन मिळण्याकरीता व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. वादी पुढे असे कथन करतो की प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकत सर्व्हे नं. ८७/४ ही दि. ०९/०९/२०२० रोजी खरेदीखताने श्री. अजय जनार्दन म्हात्रे व श्री. अभिजित जनार्दन म्हात्रे यांना विकलेली आहे. सदर मिळकत प्रतिवादी यांनी वादीचे अपरोक्ष विकलेली आहे. त्यामुळे या मिळकती संदर्भात विकत घेणाऱ्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन समावेश करणे आवश्यक आहे. तसेच त्या अनुषंगाने अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती होणे आवश्यक आहे. म्हणुन वादींचा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी वादी विनंती करीत आहे.

**०३.** प्रतिवादींनी या अर्जावर आपले म्हणणे दाखल केले. त्यांनी सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नसल्याचे कथन केले. प्रतिवादी पुढे असे कथन करातात की, सदरचे खरेदीखत दावा दाखल करण्यापुर्वी झालेले आहे याची माहिती वादींना होती तरीही वादींनी दिर्घ विलंबाने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजुर करणे योग्य आहे काय ? | होय |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०५.** वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील

कथनांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दावा मिळकत ८७/४ ही दावा मिळकतीचे वर्णनात नमुद आहे. वादींनी या दाव्याद्वारे या मिळकतीसह इतर मिळकतीमध्ये असणारा त्यांचा हिस्सा सरसनिरस मानाने वाटप करुन ताबेकब्जात देण्याची विनंती केलेली आहे. दावा मिळकतीपैकी सर्व्हे नं. ८७/४ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दि. ०९/०९/२०२० रोजी अभिजित जनार्दन म्हात्रे व अजय जनार्दन म्हात्रे यांना नोंदणीकृत खरेदीखताने विकल्याचे दाखल खरेदीखत दस्तावरुन निदर्शनास येते. या खरेदीखताच्या अनुषंगाने वादींनी प्रतिवादीपणात प्रतिवादी क्र. १९ व २० म्हणुन खरेदी घेणाऱ्यांचा समावेश करावा व तशी दुरुस्ती करण्याची विनंती न्यायोचित आहे. तसेच वादी यांनी या खरेदीखताच्या अनुषंगाने अर्जात नमुद केल्याप्रमाणे कलम ९ अ समाविष्ट करण्याची तसेच विनंती कलमामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे ई १ व ई २ प्रमाणे दुरुस्ती मागितलेली आहे. सदरचा दावा हा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये खरेदीखताने विकलेल्या मिळकतीचा समावेश आहे. त्यामुळे वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दरुस्ती होणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता वादी यांनी मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे आवश्यक आहे. या दुरुस्तीने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी विहित मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दाखल करावी.

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2022.10.14 17:44:04 -0800

खालापूरः (आर.डी.वाबळे)

दि. १४/१०/२०२२ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C., Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | : 14/10/2022 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 14/10/2022 |
| (e) | Judgment/Order uploaded on | : 15/10/2022 |